## इयत्ता – दुसरी – पाठ्यक्रम

विद्यार्थ्यांना पुढील **उद्दिष्टे** साध्य करण्यास मदत व्हावी म्हणून चेतक आणि पोषक वातावरण निर्माण करणे–

१. गाणी समूहात व एकट्याने म्हणणे.

२. चित्रमालिकेच्या साहाय्याने गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करणे.

३. वस्तू, पशू, पक्षी, चित्र इ. बद्दल माहिती सांगणे.

४. शाळेबद्दल, गावातील/शहरातील ठिकाणांबद्दल माहिती सांगणे.

५. आवडते खेळ, खेळणी, वाहने अन्य वस्तू यांच्याबद्दल मित्रांशी गप्पा मारणे.

६. विविध लोकांशी योग्य प्रकारे संवाद साधणे.

७. सुमारे ६०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती आणि २०० शब्दांची भाषण शब्द संपत्ती विकसित करणे.

८. सुमारे ५० दृक्–शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे.

९. सूचना वाचून सूचनेनुसार कृती करणे.

# इयत्ता २ री – पाठ्यक्रम

## अध्ययन क्षेत्र – वर्ग, शाळा आणि समाज येथील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| बडबडगाणी | माहिती असलेली बडबडगाणी म्हणावयास सांगणे. विविध कॅसेट्स, सीडीज यावरील बडबडगाणी ऐकविणे. विद्यार्थ्यांकडून म्हणवून घेणे. | माहिती असलेली बडबडगाणी म्हणणे. गाणी लक्षपूर्वक ऐकणे. शिक्षक/ शिक्षिकांच्या मागोमाग म्हणणे, गटात सराव करणे. | अगोदर शिकलेली गाणी आठवतात. | आवडीने गाणी म्हणतात. | एकट्याने, समूहात गाणी म्हणतात. | तोंडी चाचणी (बडबडगाणी) |
| सूचना | खेळाच्या स्वरूपात विविध कृती करण्यासंबंधी सूचना देणे. दिलेल्या सूचनेतील क्रियापद फलकावर लिहिणे, विद्यार्थ्यांकडून वाचून घेणे. गटात सराव करण्यास सांगणे. | सूचना लक्षपूर्वक ऐकणे, फलकावर लिहिलेला शब्द पाहणे, वारंवार वाचणे व सूचनेनुसार कृती करणे. | दिलेली सूचना आणि त्याचा निदर्शक शब्द यांच्यात साहचर्य निर्माण होते. | आनंदाने खेळ खेळतात. | परिसरातील मित्रांबरोबर हाच खेळ खेळतात. | तोंडी चाचणी (सूचना) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| अभिनयगीत | सीडीजवरील अभिनयगीते संगणकावर/ दूरचित्रवाणीवर दाखविणे. कॅसेट्सवरील गीते ऐकविणे. त्यावर अभिनय, हावभाव शिकवून नवीन अभिनयगीतांचा सराव करून घेणे. | लक्षपूर्वक निरीक्षण करणे.<br>शिक्षक/शिक्षिकांनी केलेल्या कृतींचे निरीक्षण करून त्यानुसार गीतावर अभिनय करणे. | अभिनय आणि गाण्याचे शब्द यांच्या साहचर्यामुळे, तसेच फलकावरील लेखनामुळे शब्द, त्याचा आकार आणि अर्थ यांचे संबंध दृढ होतात. | आनंदाने अभिनयगीते गातात. | नव्याने शिकलेली गाणी घरी साभिनय म्हणतात. परिसरातील मित्रांना म्हणून दाखवितात. | निरीक्षण व नोंद |
| दृक्–शब्दपट्ट्यांचा खेळ | 'राजा म्हणतो...' खेळासंबंधी प्रात्यक्षिकासह सूचना देणे. | शिक्षक–शिक्षिकांनी दिलेल्या सूचनेनुसार गोलात राजा झालेल्याने आज्ञा देतानाच तिची शब्दपट्टी दाखविणे व इतरांनी तशी कृती करणे. | क्रियादर्शक पट्ट्या आणि त्यांचे उच्चार यांच्यात साहचर्य निर्माण होते. | खेळाचा आनंद लुटतात. | दाखविलेल्या क्रियापट्टीनुसार कृती करतात. परिसरातील मित्रांबरोबर हाच खेळ खेळतात. | वाचन चाचणी |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | | नंतर सराव झालेल्या आज्ञेच्या केवळ पट्ट्या दाखविणे आणि इतरांनी त्यानुसार कृती करणे. | | | | |
| प्राण्यांच्या व त्यांच्या हालचालीच्या नामपट्ट्या | 'राज्य कुणावर...?' खेळासंबंधी प्रात्यक्षिकासह सूचना देणे. | शिक्षक/शिक्षिकांनी दिलेल्या सूचनेनुसार सर्वांना गोलात बसवून ज्याच्यावर 'राज्य' आले असेल त्याने संगीताच्या तालावर गोलाभोवती फेऱ्या मारणे व संगीत थांबताच ज्याच्याजवळ पोहोचला असेल | क्रियादर्शक पट्ट्या आणि त्यांचे उच्चार यांच्यात साहचर्य निर्माण होते. | खेळाचा आनंद लुटतात. | दाखविलेल्या क्रियापट्टीनुसार कृती करतात. परिसरातील मित्रांबरोबर हाच खेळ खेळतात. | वाचन चाचणी |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | | त्याच्या पाठीत हलकेच चापट मारून हातातील चिठ्ठी देणे. चिठ्ठीवरील नाव वाचणे व त्या प्राण्याच्या हालचालींची नक्कल करणे. | | | | |
| | ‘शब्दबागे’ची सफर घडवून आणणे. | शब्दबागेच्या सफरीत सहभागी होऊन मित्रांना शब्दफुलांची ओळख करून देणे. | नवीन शब्दांची ओळख होते. | | ‘शब्दबागे’तील फुलांवरील नावे वाचतात. परिसरातील मित्रांबरोबर हाच खेळ खेळतात. | |
| गोष्टी, चित्रमालिका | स्वतः गोष्ट सांगणे, पुस्तकातील गोष्ट वाचून दाखविणे. कॅसेट्स, सीडीज | गोष्टी लक्षपूर्वक ऐकतात, पाहतात. चित्रमालिकेच्या साहाय्याने गोष्ट रचण्याचा प्रयत्न | गोष्टीतील घटना, पशू, पक्षी, माणसे यांची नावे स्मरणात राहतात. शिक्षक/शिक्षिकांचे | गोष्टीचा भरपूर आनंद घेतात. | गोष्टीतील पात्रांची नावे, घटना यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात. | तोंडी चाचणी (गोष्ट सांगणे) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | वरील गोष्टी ऐकविणे, दाखविणे. चित्रमालिका दाखवून विद्यार्थ्यांकडून गोष्ट तयार करून घेणे. | करतात. गटात एकमेकांच्या मदतीने गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करतात. स्वतःला माहिती असलेली वेगळी गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करतात. | आवाजातील चढ–उतार, हावभाव, तसेच सीडीजमधील दृश्ये पाहून नवीन शब्दांचे अर्थ समजतात. | | घरी, परिसरातील मित्रांना गोष्टी ऐकवितात. | |
| गप्पा, गाणी | आदल्या दिवशी दिलेल्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांनी आपले आवडते खेळणे आणले आहे ना याची खात्री करून घेणे. गटात बसायला सांगून आपापल्या खेळण्याबद्दल मित्रांशी गप्पा मारण्यास सांगणे. | सूचनेनुसार आपापली खेळणी मित्रांना दाखवून त्यांच्याबद्दल बोलायला सुरुवात करणे. बोलता बोलता खेळासंबंधी अथवा खेळाडूसंबंधी गप्पा सुरू झाल्यास त्यातही सहभागी होणे. | आपल्याला खूप काही सांगायचे होते, पण मराठीतील पुरेसे शब्द आपल्याजवळ नाहीत ते मिळविले पाहिजेत याची जाणीव होते. | गप्पा–गोष्टींचा मनसोक्त आनंद घेतात. | शाळेतील मित्रांच्या खेळण्यांची माहिती परिसरातील मित्रांना सांगतात. | – |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | खेळण्यासंबंधी गाणी ऐकविणे, विद्यार्थ्यांकडून म्हणवून घेणे. | शिक्षक–शिक्षिकांच्या मागोमाग गाणी म्हणणे. | गाण्यांतील नव्या शब्दांची जाणीव होते. | गाण्यातील लयीचा आनंद घेतात. | पालकसभेच्या वेळी प्राण्यांचे मुखवटे घालून काही गाणी सादर करणे. | प्रात्यक्षिक |
| | गटात खेळण्यांची बिंदूचित्रे व रंगपेट्या देणे. | खेळण्यांची बिंदूचित्रे जोडून त्यात रंग भरणे. | चित्रे रंगवीत असताना आकारातील फरकांची जाणीव होते. | रंगविलेल्या चित्राचा अभिमान वाटतो. | गटाने रंगविलेल्या चित्रांची चिकटवही तयार करतात. | कृती/उपक्रम |
| (ठिकाणांची)नावे | गावातील/शहरातील विशेष ठिकाणांची सहल काढणे. (शक्य नसल्यास त्यांचे फोटो दाखविणे) त्यांच्याबद्दल माहिती देणे. | निरीक्षण करणे. माहिती लक्षपूर्वक ऐकणे. | गावातील–शहरातील ठिकाणांची विशेष माहिती कळते. | नवी माहिती कळल्याचा आनंद होतो. | घरी आणि परिसरातील मित्रांना आपल्या अनुभवाबद्दल माहिती देतात. | – |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| (व्यावसायिकांशी) संवाद | विविध व्यावसायिकांच्या भेटी आयोजित करणे. | व्यावसायिकांना अभिवादन करून तेथे बसण्याची परवानगी घेणे. तेथे बसून त्यांच्या कामाचे निरीक्षण करणे. काही वेळाने निरीक्षणात आलेल्या शंका विचारणे. | अनोळख्या व्यक्तीशी संवाद कसा करावा ते कळते. नवी माहिती मिळते. | नवी माहिती कळल्याचा आनंद होतो. | गटात आपल्याला मिळालेली माहिती सांगतात. | तोंडी चाचणी (माहिती सांगणे) |